दिनांक १५/०६/२०२६

# प्रेस नोट

**सोशल मिडीयाद्वारे खंडणी वसूल करणाऱ्या सिंडीकेटचा गुन्हे शाखेकडून पर्दाफाश.**

मुलुंड येथील एका व्यवसायिकास एका सोशल मिडीयावरील कार्यरत न्युज चॅनेलचे संबंधित असल्याचे भासवून आपसात संगनमत करून फौजदारीपात्र कट रचून ते शासकीय यंत्रणेत असल्याचे भासवून व्यावसायिकायाच्या दुकानातील दुग्धजन्य पदार्थ खराब असल्याचा खोटा व्हिडीओ बनवून सोशल मिडीयाद्वारे प्रसारीत करून त्यांचे दुकानाचे नाव खराब करून बदनामी करण्याची तसेच व्यवसाय बंद पाडण्याची भिती दाखवून खंडणीची रक्कम ऑनलाईन स्वरुपात स्विकारुन उर्वरीत रक्कम रोख स्वरुपात देण्याबाबत तक्रार गुन्हे शाखेस प्राप्त झाली होती. नमूद माहितीच्या अनुषंगाने मा. वरिष्ठांच्या आदेशाने मुलुंड येथील सोनापूर सिग्नल परिसरात गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक व कक्ष-५ चे अधिकारी व अंमलदार यांच्या संयुक्त पथकाने आरोपीस खंडणीची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यासाठी सापळा रचला होता. त्याअनुंषगाने दिनांक १४/०६/२०२६ रोजी नमूद ठिकाणी ०१ इसम खंडणीची रक्कम स्विकारताना मिळून आला.

सदर बाबत मुलुंड पोलीस ठाणे, येथे गु.र.क्र. ७७८/२०२६ कलम ३०८(२), ३५१(१), २०४, ६१(१), ३(५) भा. न्या. सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमूद गुन्हा पुढील तपासकामी गुन्हे शाखेस वर्ग करण्यात आलेला आहे. नमूद गुन्हयाचा तपास गु.प्र.शा. गु.र. क्र. ६८/२०२६ अन्वये कक्ष-०५, गुन्हे शाखा, मुंबई यांचेकडून करण्यात येत आहे.

दि. १५/०६/२०२६ रोजी आरोपीत इसमास मा. अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, ३७ वे न्यायालय, किल्ला कोर्ट, मुंबई येथे हजर करण्यात आले असता मा. न्यायालयाने दिनांक १८/०६/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजूर केलेले आहे.

अटक करण्यात आलेल्या इसमाचे वर्णन:- एक ४० वर्ष वयाचा इसम, धंदा - रिलस्टार, रा.ठि. निर्मल लाइफस्टाईल, एल.बी.एस रोड, मुलुंड, मुंबई.

सदरची प्रभावी कामगिरी गुन्हे शाखा, मुंबई पथकाने मा. पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री.अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) कृष्ण कान्त उपाध्याय यांच्या मार्गदर्शनाखाली मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) श्री. राज तिलक रौशन व गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक व कक्ष-५ मधील अधिकारी व अंमलदार यांनी यशस्वीपणे पार पाडली आहे.

Scanned with CamScanner